PDFaid.com
#1 pdf solutions

**अपंग व्यक्तीसाठी वापरावयाच्या चारचाकी [redacted]वाहनांत फेरफार करण्याबाबत.**

**परिवहन आयुक्त कार्यालय**
प्रशासकीय इमारत, ३/४ मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

क्रमांक - एमव्हीआर ०९०२/सीआर-४६-डी/का.२(४)/जा.क्र ७८१७ दिनांक 2 9 JUN 2011

वाचा :-१. केंद्र शासनाचे पत्र क्र.आरटी-११०१७/०७/२००११-एमव्हिएल दिनांक - ०५/०५/२०११.
२. केंद्र शासनाचे पत्र क्र. आरटी ११०१२/१२/२००१-एमव्हीएल, दिनांक २९.५.२०००९

## प रि प त्र क

अपंग व्यक्तीसाठी वापरावयाच्या चारचाकी वाहनात फेरफारकरण्यासाठी यापूर्वी संबंधित परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरिक्षकांनी वाहन तपासल्यानंतर व सदर वाहन अर्जदार अपंग व्यक्ती समाधानकारकरीत्या चालवू शकत असल्याबद्दल अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुखाच्या शिफारशीसह परिवहन आयुक्त कार्यालयात प्रकरण पाठविण्यात येत असे. सदर प्रकरण परिवहन आयुक्तांच्या शिफारशीसह मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात असे. तथापि, या संपूर्ण प्रक्रियेमध्ये ३ ते ४ महिन्यांचा कालावधी व्यतित होत असल्याने सदर प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर होण्यासाठी मान्यतेचे अधिकार परिवहन आयुक्तांना देण्यात यावेत अशी विनंती या कार्यालयाने आपल्या दिनांक - ८/११/२०१० पत्राद्वारे केंद्र शासनास केली होती.

केंद्र शासनाने आपल्या पत्र क्रमांक - आरटी-११०१७/०७/२०११ दिनांक - ५/५/२०११ अन्वये असे निर्देश दिले आहेत की, अपंगासाठी तांत्रिक फेरफार करताना रेट्रोफिट किट (Retrofit Kit) बसविल्याने वाहनाच्या मूळ ढाच्यात कोणताही बदल होत नाही. सबब, मोटार वाहन अधिनियम १९८९ च्या कलम ५२ च्या तरतूदींचा भंग होत नसल्याने "अधिकृत कार्यशाळा" म्हणून राज्य शासनाने मान्यता दिलेल्या रेट्रोफिट करणाऱ्या संस्थांकडून प्राप्त होणारी प्रकरणे केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्याची आवश्यकता नसून राज्य शासनाच्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर त्यांना मान्यता द्यावी. तसेच केंद्र शासनाने आपल्या सदर पत्रात अधिकृत कार्यशाळांना मान्यता देण्याची जबाबदारी राज्या शासनाची असल्याचे नमूद केले आहे. सबब, आपल्या कार्यक्षेत्रात अपंगासाठीच्या वाहनांमध्ये तांत्रिक फेरफार करणारी संस्था असल्यास त्यांना राज्य शासनाची अधिकृत कार्यशाळा म्हणून मान्यता घेण्यास उद्युक्त करावे.

याबाबत कळविण्यात येते की, आतापर्यन्त मे. फेरो इक्वीप, मुंबई या संस्थेस राज्य शासनाने आपले पत्र क्र. एमव्हीआर -०५१०/११३०/प्र.क्र.६००/परि-२.दिनांक १.१०.२०१० अन्वये अपंगांच्या सोईसाठी त्यांच्या चारचाकी वाहनात फेरफार करून रेट्रोफिट किट बसविणारी "मान्यताप्राप्त कार्यशाळा" म्हणून मान्यता दिली आहे. सदर संस्थेला ए.आर.ए.आय., पुणे यांनी ज्या वाहनांसाठी रेट्रोफिट किट बसविण्यास मान्यता दिली आहे. त्या प्रमाणपत्राची प्रत आपणांकडे पाठविण्यात येत आहे.

ए.आर.ए.आय. पुणे यांच्या मान्यता प्रमाणपत्रात नमुद केलेल्या वाहनांवर रेट्रोफिट किट बसविल्याबाबत अर्जदाराकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अशा वाहनाची मोटार वाहन निरिक्षकांनी तपासणी करुन केंद्र शासन पत्र क्र.आरटी-११०१२/१२/२००९-एमव्हीएल, दिनांक २९.५.२००९ मधील परिच्छेद क्रमांक ५ मध्ये नमूद केलेल्या मुद्द्यांप्रमाणे अहवाल कार्यालय प्रमुखांना सादर करावा. तपासणीअंती सदर रेट्रोफिट किट अर्जदार व्यक्तीसाठी वापरण्यास सुयोग्य असल्याचे व सदर अपंग व्यक्ती असे वाहन चालविण्यास सक्षम असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालय प्रमुखांनी स्वत: वाहनाची तपासणी करावी व आपल्या स्तरावर वाहनाच्या नोंदणीबाबत निर्णय घ्यावा.

**प्रति,**
सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी /
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी

**परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई,**

**प्रत माहितीकरीता -**
प्रधान सचिव, गृह (परिवहन) विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.